ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# आर्थिक विकासामध्ये उद्योजकांची भूमिका

**मोहन सखाराम कांबळे, Ph. D.**

*आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, पुणे- ०४*

**प्रास्ताविक:**

एकविसावे शतक हे बाजारपेठ आणि अर्थकारण यांचे शतक म्हणून मानले जाते. आज विकसित अर्थव्यवस्था हया अधिक प्रगत होत आहेत. आर्थिक विकासाची रेषा युरोप, अमेरिका आदी पृथ्वीच्या पश्चिम गोलार्धाकडून सरकून ती पूर्व गोलार्धाकडे स्थिरावत आहे. चीन, भारत व आशिया खंडातील इतर अर्थव्यवस्थांनी वेगवान विकास साधून संपूर्ण जगाचे वेधले आहे.

भारतात जागतिकीकरण, उदारीकरण, आणि खाजगीकरणाचे युग १९९० मध्ये अवतरले. आर्थिक क्षेत्रातील बदल हे तेव्हापासून आपल्या समाज जीवनांवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे परिणाम करीत आहे. महिला शिक्षण, आर्थिक कार्यात त्यांचा सहभाग, यामुळे कुटूंबसंस्थेचे स्वरुप बदलून जात आहे. स्वतंत्र लहान लहान कुटुबे निर्माण झाली. दुहेरी उत्पन्नामुळे पर्यायी उत्पन्न सुरक्षा निर्माण झाली. प्रयोग म्हणून स्वयंरोजगार, स्वतंत्र व्यवसायाकडे तरुण आकर्षित झाले. सरकारी नोकऱ्यांची घटती संख्या, तसेच वित्तीय संस्थांकडून सहज व पुरेसा अर्थ पुरवठा होवू लागल्यामुळे आर्थिक साहस, तसेच उद्योग करण्याच्या वाटा साध्य झाल्या. जुन्या औद्योगिक आर्थिक बंधनातून लाभलेली मुक्ती नवे तंत्रज्ञान, कमी भांडवलावर सुरु होऊ शकणारे सेवा उद्योग, यामुळे सभोवताली उद्योगजगतेत यशस्वी ठरलेली हजारो उदाहरणे आता दिसू लागली आहेत. ग्राहकांच्या विविधतेतील वाढ, मुक्त व्यापार यामुळे उद्योजकीय संधीची वाढझाली. नव्या पिढीला तात्काळ यश प्राप्त करण्याची संधी उपलब्ध झाली. नोकरीपेक्षा स्वतंत्र व्यवसायात त्वरीतयश मिळते असे दिसून येते. त्यामुळे भारतात उद्योजकीय संस्कृती विकसित होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले. ही सुप्त आर्थिक क्रांती मानली जाते. त्याचे दृश्य परिणाम म्हणजे जी.डी.पीचा सतत वाढत असणारा दर, परकीय भांडवलातील वाढ, दरडोई राष्ट्रीय उत्पन्नात होत असलेली वाढ, भारतातील प्रत्येक राज्याची आर्थिक विकासासाठी सुरु असलेली स्पर्धा भारतातील, गाहक वर्गात झालेली प्रचंड वाढ, नोकरी, संशोधन, तसेच उच्च शिक्षण, यासाठी परदेशात जाणाऱ्या भारतीय नागरिकांच्या संख्येत झालेली वाढ, उंचावणारा भाग बाजार निर्देशांक, विदेशी कंपन्याबरोबर भारतीय कंपन्याचे व्यवसायवाढीसाठी होत असलेले एकत्रीकरण, भारतीय संस्कृतीला पाश्चात्य जगात वाढीस लागलेला आदरभाव या पार्श्वभूमीवर उद्याजेकीय संस्कृतीचा उदय होण्यास मदत झाली.

जगातिक राष्ट्रीय स्तरावर होत असलेले बदल आर्थिक आणि औद्योगिक विकास महाराष्ट्राच्या संदर्भात महत्वाचे आहेत. गेल्या दशकाता भारतात घडून आलेल्या आर्थिक विकासाचा सर्वाधिक लाभ पश्चिम विभागाला म्हणजे महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश आणि गोवा या राज्यांनाझाला आहे. असे एका राष्ट्रीय अहवालात नमूद

केले आहे. मात्र आर्थिक विकसाला लाभणारे प्रोत्साहन आणि उद्योजकीय संस्कृती या निकषावर गेल्या काही वर्षात महाराष्ट्राची पिछेहाट झालेली दिसते. पश्चिम विभागात गुजरात व गोवा आणि संपूर्ण देशात आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू राज्ये आघाडीवर आहेत.

भारतातील १० वर्षातील सामाजिक आर्थिक बदल पाहिले तर काही ठळक बाबी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. प्रचंड लोकसख्येला पुरुन उरणारा अन्नधान्यसाठा

२. जगात सर्वात मोठी लोकशाही शासनप्रणालीची यशस्वीता

३. मंदीच्या काळातही विकास दर स्थिर,तो वाढण्याची शक्यता.

४. महिलांचे मोठया प्रमाणात सबलीकरण

५. एकत्र कुटूंबपध्दती ऐवजी विभक्त कुटूंबपध्दती रुढ

६. ज्ञान व माहिती तंत्रज्ञानात जागतिक आघाडी

७. विनियंत्रण, खाजगीकरण यांना प्रोत्साहन देणारी धोरणे

विशेषत: आर्थिक आघाडीवरील होणारे बदल, नवी अर्थव्यवस्था ही माहिती युग म्हणून का संबोधली जाते. त्यातून उद्योजकता वाढीला कोणत्या प्रकारे चालना मिळेल? परिणामी आर्थिक विकासाचा वेग कसा वाढेल? या सर्वांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरेल.

भारतीय उद्योग सध्या आहे त्यापेक्षा राष्ट्रीय उत्पादनात पाच पटीने भर घालू शकतात असे जागतिक बँकेतील अर्थतज्ज्ञ मार्क शुट्झ यांनी एका अहवालात नमूद केले आहे. हा भारतीय आर्थिक परिस्थितीवर एक अभ्यासपूर्ण प्रकाश टाकणारा अहवाल आहे.

**उद्योजक संकल्पना:-**

उद्योजक हा शब्द प्रथम फ्रेंच भाषेमध्ये वापरण्यात आला. सोळाव्या शतकाच्या प्रारंभी लष्करी मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या आणि त्या अनुशंगाने धाडसाचे कृत्य करणाऱ्या व्यक्तींना उद्योजक म्हटले गेले. तेव्हापासून उद्योजक म्हणजे धाडसी किंवा साहसी व्यक्ती हा अर्थ व्यवहारात रुढ झाला आहे.

वेबस्टर यांच्या मते, 'जोखमीची जबाबदारी स्वीकारणारी व व्यवसायाचे व्यवस्थापन सांभाळणारी व्यक्ती म्हणजे उद्योजक होय.

**इव्हान्स यांनी उद्योजकाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.**

"उद्योजक व्यावसायिक उपक्रमाच्या स्थापनेचा विचार करतात त्या करिता आवश्यक असलेली संघटना उभारतात, उपक्रमाचे व्यवस्थापन सांभाळतात आणि उपक्रमांचा कारभारावर नियंत्रण ठेवतात''.

देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये किंवा समाजाच्या आर्थिक जीवनामध्ये विशिष्ट प्रकारचे बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेला आर्थिक विकास म्हणता येईल आर्थिक विकासही विभिन्न प्रकारच्या बदलांची नि पती म्हणून घडून येणारी एक प्रक्रिया असून ती सातत्याने सुरु असते.

हया बदलामुळे देशात वस्तू व सेवांच्या उत्पादनांची पातळी वाढते. वस्तू व सेवांचे उत्पादन वाढल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नातही वाढहोते. प्रत्येक देशाचे राष्ट्रीय उत्पन्न हे एकूण (Gross) व शुध्द (Net)असे दोन प्रकारे सांगितले जाते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात किती वाढझाली एवढेच पाहून त्या देशाच्या आर्थिक विकासाबद्दल नेमकी कल्पना येवू शकत नाही. त्यामुळेच एक वर्षाच्या मुदतीत राष्ट्रीय उत्पन्नात वाढ किती झाली हया निकषाचा उपयोग करुन मगच देशाच्या आर्थिक विकास किती झाला ते ठरविले जाते.

उद्योजकांना अनेक नवनवीन आव्हांनाना सामोरे जावे लागते त्यानुसार विविध कार्ये त्यांना करावी लागतात ही भूमिका पार पाडल्यामुळे देशाच्या आर्थिक प्रक्रियेला मदत होते.

**१. उद्योजकाशिवाय कोणत्याही प्रकारचे उत्पादन कार्य संभवत नाही.**

एखाद्या देशाचा आर्थिक विकास घडून येण्याकरिता त्या देशात विविध संसंसाधनाची उपलब्धता असणे व त्या संसासधनाचा योग्य उपयोग घडून येणे आवश्यक असते. ही संसाधने नैसर्गिक, वित्तीय, आणि मानवी संसाधने अशी तीन प्रकारची असतात. उत्पादनाचे विविध घटक एकत्र आणून उत्पादन प्रत्यक्षात आणण्याचे कार्य उद्योजकच करत असतो.

**२. उद्योग क्षेत्रातील वाढत गेलेली असंभाव्यता–**

ग्राहकांची गरज लक्षात घेवून जेव्हा वस्तूचे उत्पादन केले जाते. औद्योगिक क्रांती घडून आल्यावर कारखाना पध्दती निर्माण झाली. कारखान्यात प्रचंड प्रमाणात उत्पादन होवू लागले. बाजापेठांमधील स्पर्धाही अतितीव्र झाली त्यामुळे उद्योग क्षेत्रात जोखीम उत्पन्न झाली. उद्योग व्यवसायाच्या क्षेत्रात कोणत्याही कारणामुळे उत्पन्न होणाऱ्या जोखीमची जबाबदारी उद्योजक उचलत असल्यामुळे उत्पादनाचे कार्य सुरळीतपणे सुरु राहते. हया दृष्टीने उद्योजकांची भूमिका अतिशय महत्वाची आहे.

**३. उद्योजकांचे नवनिर्मितीचे कार्य:–**

" शास्त्रज्ञानी केलेल्या संशोधनामुळे शोध लागतात. हया शोधांच्या निष्पत्तीचा व्यावहारिक पातळीवर व्यावसायिक स्वरुपात करुन घेण्यात आलेल्या उपयोगाला नवनिर्मिती असे म्हणतात''. उद्योजकाकडून नवनिर्मितीचे कार्य जेवढे मोठया प्रमाणावर केले जाईल तेवढा देशाच्या आर्थिक विकासाचा वेग जास्त राहतो. त्या अनुषंगाने नवीन बाजारपेठांचा शोध घेवून नवीन पध्दतीने संघटनेची उभारणी केली जाते.

**४. उद्योजकांची निर्णय प्रक्रिया**

विशिष्ट निष्कर्षाप्रत येण्यासाठी आणि हया बाबतीत निवाडा करण्यासाठी उद्योजकांने केलेल्या मानसिक प्रयत्नांना निर्णय प्रक्रिया असे म्हणतात. उद्योजकांनी घेतलेल्या विविध निर्णयाचा परिणाम अचूक ठरल्यास व घेतलेले निर्णय अचूक ठरल्यास उद्योगाची प्रगती होते. या उलट उद्योजकापुढे वेळोवेळी प्रश्न निर्माण होतात. तेव्हा निर्णय घ्यावे लागतात. उद्योजक स्वार्थी असल्यास समाजाचे कल्याण साध्य होईलच असे नाही. प्रत्यक्ष व्यवहारात निर्णय घेताना उद्योजकांनी आपला फायदा व उद्योगाची प्रगती याबरोबरच हया निर्णयाचा समाजाच्या आरोग्यावर, प्रगतीवर व कल्याणावर होणाऱ्या संभाव्य परिणामांची काळजीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे.

**५. भांडवलाची दुर्मिळता आणि उद्योगांचे कार्यक्षम वित्तीय व्यवस्थापन**

योग्य वेळी योग्य प्रमाणात भांडवलाचा पुरवठा होणे, हे जेवढे महत्वाचे आहे. तसेच महत्व भांडवलाचा योग्य उपयोग होण्यालाही आहे. कार्यक्षम वित्तीय व्यवस्थापनामुळेच उद्योगाला आवश्यक असलेल्या भांउवलाची निश्चित उपलब्धता आणि त्या भांडवलाचा व्यवस्थित उपयोग शक्य होतो. उद्योजकांनी त्यांच्या उद्योगांचे वित्तीय व्यवस्थापन कार्यक्षमपणे केले असल्यास उद्योगांच्या सर्वांगिण प्रगतीचा मार्ग प्रशस्त होतो. हयाचा संपूर्ण देशाच्या अर्थकारणवर व आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम होतो.

**६. कार्यक्षम विपणन व्यवस्था:-**

उद्योजकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे विकसनशील देशाच्यांही विपणन व्यवस्थेची कार्यक्षमता बऱ्याच प्रमाणात वाढली आहे. देशामधील विपणन व्यवस्था कार्यक्षम असल्यास कारखानदारांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना योग्य भाव, किंमत मिळते सर्व प्रकारच्या वस्तूंची विक्री करण्याची व्यवस्था होते. विपणन व्यवस्था क्रयशक्ती निर्माण करु शकत नाही. पण ती समाजातील प्रचलित क्रय शक्तीला योग्य दिशेने वळवू शकत असल्यामुळे आर्थिक व्यवहारांची पातळी वाढविण्यासाठी आवश्यक असलेली परिस्थिती तिथे कारणीभूत ठरते.

**७. भांडवल निर्मितीला चालना:-**

कोणत्याही उद्योगाची स्थापन करण्यासाठी उद्योजकाला स्वत:चे पैसे तसेच इतर सर्वाकडून गोळा केलेले पैसे गुंतवावे लागतात. उद्योजकांनी भाग किवा कर्जरोखे विकल्यामुळे समाजात ठिकठिकाणी विखुरलेली सुप्त बचत व्यवस्थितपणे वळविली जाते. व ती भांडवलामध्ये परिवर्तीत होवून उत्पादक कार्यात गुंतविली जाते. त्यामुळे समाजातील भांडवल निर्मितीचा दर वाढतो. उद्योजकांच्या हया कार्यामुळे समाजाच्या आर्थिक विकासाचे चक्र अविरत सुरु राहते.

**८. रोजगार संधीची निर्मिती:-**

उद्योजकांनी कोणत्याही क्षेत्रात भांडवल गुंतवणूक कडून उद्योगांची स्थापना केल्यास तेथे रोजगाराच्या संधी निर्माण होतात रोजगाराच्या संधीने अनेक बेकार पण सुयोग्य व्यक्तींना काम मिळते. अशा रितीने उद्योजकतेचा विकास झाल्यामुळे समाजात मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतात,पर्यायाने बेकारीची तीव्रता कमी होते. उद्योजकता विकास घडून आल्यास, मानवी साधनांचा सुयोग्य उपयोग घडून आल्यास,मानवी साधनाचा सुयोग्य उपयोग घडून येण्याची स्थिती निर्माण होते

९. **अर्थव्यवस्थेतील पूरक परिणाम-**

विशिष्ट क्षेत्रात गुंतवणूक केल्यामुळे जेव्हा उत्पादनाच्या पुढील अवस्थामध्ये नवीन गुंतवणूक घडून येण्यासाठी वाव व संधी निर्माण होतो. उद्योगाच्या स्थापनेमुळे अर्थकारण विभिन्न बदलाची एक प्रक्रिया सुरु होते. आणखी नवनवीन उद्योग सुरु होतात. या सर्व हालचालींचे अनुकूल परिणाम घडून येतात.

**१०. संतुलित प्रादेशिक विकास:-**

भौगोलिक दृष्टीने प्रचंड विस्तार असलेल्या भारतासारख्या प्रत्येक देशामध्ये अनेक प्रदेश आहेत. ज्या प्रदेशामध्ये आर्थिक विकासाची प्रक्रिया लवकर सुरु होते. तेथे विकासाची एक संरचना तयार होते. या कारणामुळे त्या प्रदेशाचा जलदगतीने विकास घडून येतो. मागास प्रदेशात उद्योजकांनी उद्योग सुरु करावेत. मागास प्रदेशात विकासाची संरचना तयार होण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. सरकारही या करिता विशेष सवलती देवू करते. त्याचा परिणाम संतुलीत प्रोदशिक विकास होण्यासाठी होतो.

**११. विकसनशील देशाचे आर्थिक स्वातंत्र्य-**आर्थिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला फारसा व्यावहारिक अर्थ नाही हया देशांचे जलद गतीने औद्योगिकरण घडून आल्याशिवाय हया देशांचे आर्थिक स्वातंत्र्य संभवत नाही. हयाकरिता देशामध्ये सर्व प्रकारच्या उद्योगाची स्थापना घडून येणे, उद्योगांचा विस्तार विकास घडून येणे व उद्योगामध्ये विभिन्न वस्तूंचे मोठया प्रमाणावर उत्पादन घडून येणे आवश्यक आहे.

**१२. जीवनमानात सुधारणा व क्रयशक्ती वाढते-** उद्योजकांनी केलेल्या प्रयत्नांमुळे उद्योजकतेचा विकास घडवून आल्यामुळे मोठया प्रमाणात उद्योगांची स्थापना हेते. वस्तूचे मोठया प्रमाणात उद्योगांची स्थापना होते. वस्तूचे मोठया प्रमाणात उत्पादन झाल्यामुळे त्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढते. व नागरिकांच्या क्रयशक्तीमध्ये वाढ होते. अशा रितीने उद्योजकतेचा विकास आणि उद्योजकांनी केलेले प्रयत्न त्या देशातील नागरिकांच्या उत्पन्नामध्ये व क्रयशक्तीमध्ये वाढ होण्यासाठी कारणीभूत ठरतात. वरील मुद्यांवरुन उद्योजकांची राष्ट्रीय विकासातील भूमिका स्पष्ट होते.

**संदर्भ:-**

*श्री. कवडेकर-२००९, 'उद्योजकीय संस्कृती आणि महारा ट्र', डायमंड पब्लिकेशन, पुणे.*

*श्री. झेंडे-२०१०, 'स्वप्न उद्योजकांचे', डायमंड पब्लिकेशन, पुणे.*

*श्री. प्रभाकर देशमुख-२०१०, 'उद्योजकता संकल्पना आणि व्यवहार', मनोहर पिंपळापुरे प्रकाशन क्र.२२७*